**Series : X4YZW**

**SET ~ 4**

रोल नं.

**Roll No.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

प्रश्न-पत्र कोड
**Q.P. Code 9**

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

# मराठी
# MARATHI

*वेळ : 3 तास*
*निर्धारित समय : 3 घंटे*
*Time allowed : **3** hours*

*एकूण गुण : 80*
*अधिकतम अंक : 80*
*Maximum Marks : 80*

**नोट / NOTE** ~

(I) प्रश्नपत्रिकेत **11** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.

Please check that this question paper contains **11** printed pages.

(II) प्रश्नपत्रिकेत 8 प्रश्न आहेत; तपासून घ्या.

Please check that this question paper contains **8** questions.

(III) प्रश्नपत्रिकेच्या उजवीकडे छापलेला प्रश्नपत्रिकेचा कोड उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर लिहा.

Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.

(IV) **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक दिलेल स्थानवर अवश्य लिहा.**

**Please write down the serial number of the question in the answer-book at the given place before attempting it.**

(V) प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्नपत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्नपत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करू नये.

15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

~

*सर्वसाधारण सूचना :*

*(i)* *या प्रश्नपत्रिकेत – **अ, ब, क, ड** असे **चार** विभाग आहेत.*

*(ii)* *सर्व विभाग आवश्यक आहेत.*

*(iii)* ***यथाशक्य** सर्व विभागाची उत्तरे क्रमाने लिहा.*

*(iv)* *एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच लिहा.*

**विभाग – 'अ' – वाचन व आकलन** **15**

1\. पुढील गद्य उतारा वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

भाषा म्हणजे आपण जे बोलतो ते! आपण जे बोलतो त्याला आपण एक नाव दिलेलं असतं, महाराष्ट्रात आपण त्याला 'मराठी भाषा' म्हणतो. आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्यातले लोक जे बोलतात त्याला ते 'कानडी भाषा' म्हणतात. उत्तरेकडच्या गुजरात राज्यातील लोक त्याला 'गुजराती भाषा' म्हणतात. आपल्या पश्चिमेकडे गोवा नावाचा एक छोटासा प्रांत आहे, तिथे लोक जे बोलतात ते त्याला 'कोंकणी भाषा' म्हणतात. ही झाली भाषांची वेगवेगळी नावं. प्रश्न असा की, आपण सगळेच बोलतो, मग भाषांची नावं वेगवेगळी का?

दुसरा एक प्रश्न मी शाळेत असताना माझ्या मनात यायचा. चिमणी, कावळा, पोपट असे पक्षी जो आवाज करतात त्याला आपण भाषा का म्हणू नये? फक्त माणसाच्याच आवाजाला भाषा का म्हणायचं? अगदी लहानपणापासून मला मांजरं आणि कुत्री यांची आवड होती. ते माझ्याशी बोलतात असंच मला वाटायच, इतकंच काय, मुंग्याही माझ्याशी बोलतात असे वाटायचे. मग त्यांच्या बोलण्याला भाषा का नाही म्हणायचं? असा मला प्रश्न पडायचा. शिवाय मी अगदी लहान असताना आकाशाकडे एकटक बघत ढग आकार कसे बदलातात ते पाहत राहायचो, आणि माझ्या मनामध्ये जो विचार येईल त्याप्रमाणे मला ढगांमध्ये आकृती दिसायला लागायच्या, काही वेळेला विमान दिसायचं. घरं दिसायची, मोठंच्या मोठं गाव दिसायचं. त्या ढगांची काही भाषा आहे का? असं विचारल्यावर मोठी माणसं म्हणायची, नाही! ढगांची किंवा प्राण्यांची अशी काही भाषा नाही. खरं तर पानं, फुलं, प्राणी बोलतात त्याही भाषाच आहेत.

भाषांचा अभ्यास, संशोधन करणारे भाषाशास्त्रज्ञ असं सांगतात की, माणसाची भाषा ही इतर प्राण्यांच्या भाषांपेक्षा, संवादापेक्षा जास्त गुंतागुंतीची असते. मग प्रश्न पडतो की, ही गुंतागुंत का निर्माण

झाली? समजा, तुम्हाला विचारलं की, तुम्ही काल काय कार्य केलं? तर तुम्ही उत्तर देऊ शकता, मी नदीवर पोहायला गेलो, विटीदांडू खेळायला गेलो, मग शाळेत आलो, वगैरे. हे असं मुंग्या, झुरळ, पकडलेली फुलपाखरे सांगू शकतील काय? इतकंच नाही, तुम्हाला विचारले की, तुम्ही पुढे काय होणार आहात? तर तेही तुम्ही सांगू शकता. म्हणजे भविष्य आणि भूतकाळाविषयी बोलण्याची बुद्धी आणि कला फक्त माणसांपाशी असते. माणसाच्या भाषेमध्ये काळाचा (time) विस्तार असतो. म्हणजे तुम्हाला क्रिकेट खेळायला जायचं असेल तर तुम्ही समोरच्या एखाद्या टेकडीकडे बोट करून म्हणू शकता की, या टेकडीवर एक मैदान आहे. तिथे आपल्याला क्रिकेट खेळायला जायचं आहे. एखाद्या झाडांच्या शेवटच्या फांदीवर चिंचा आहेत, हे तुम्ही बोट दाखवून सांगू शकता. म्हणजे स्थळ, काळ, अवकाश या मिती माणसाच्या भाषेमध्ये येऊ शकतात; माणूस वगळता इतरांच्या भाषांमध्ये येऊ शकत नाहीत. माणसाकडे अशी बुद्धी किंवा कला आहे, ही फारच मोठी गोष्ट आहे.

(a) खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. **3 × 1 = 3**

(I) भाषांचा अभ्यास, संशोधन कोण करत असते?

(A) भाषाशास्त्रज्ञ (B) वैज्ञानिक

(C) साहित्यिक (D) संपादक

(II) माणसाच्या भाषेमध्ये कशाचा विस्तार असतो?

(A) ध्वनींचा (B) पैशाचा

(C) नात्यांचा (D) काळाचा

(III) स्थळ, काळ, अवकाश या मिती कोणाच्या भाषेमध्ये येऊ शकतात?

(A) प्राण्यांच्या (B) पक्षाच्या

(C) माणसाच्या (D) झाडांच्या

(b) पुढील प्रश्नांची **15** ते **20** शब्दांत उत्तरे लिहा. **2 × 2 = 4**

(I) ढगांमध्ये बदलते आकार पाहून लेखकाच्या मनामध्ये काय विचार येत?

(II) भाषा म्हणजे काय ते सांगून महाराष्ट्राच्या आजूबाजूच्या राज्यांमध्ये कोणकोणत्या भाषा बोलल्या जातात ते लिहा.

~

(c) खालील प्रश्नाचे उत्तर सुमारे **40** ते **50** शब्दांत लिहा. **1 × 3 = 3**

माणसांची भाषा ही इतर सजिवांच्या भाषेपेक्षा वेगळी ठरते, हे लेखकाने कशाप्रकारे सांगितले आहे?

2. खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

मातीमधुनी पिकवी सोने
हिरव्या हाती किमया भारी
वनदेवीची लेक शोभते
घरधनीण हो माझी न्यारी ।।

धावत येऊनी गुलमोहरा
गूज सांगतो खट्याळ वारा
या मळ्याची स्वामीण आली
पथी सुमनांचा वर्षाव करा ।।

नीटस बांधा, नजर बावरी
अबोलीचा लेवुनी रंग
तिला पाहुनी मनी हिरमुसली
कोमल हिरवी चवळी शेंग ।।

घरधन्याला आणून न्याहारी
प्रेमे भरवी ती वृक्षतळी
गोंधळलेला चाफा बोले
खरी कोणती चाफेकळी ।।

नटली सृष्टी, झाली आबादी
परि न उमगले जगा कसे
मळे बहरती, पिके डोलती
दिन-रात तिथेच कष्ट असे ।।

~

(a) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून निवडून लिहा. **2 × 1 = 2**

(I) घरधनीणला पाहून कोण हिरमुसले आहे?

(A) स्वामीण (B) चाफेकळी

(C) गोंधळलेला चाफा (D) चवळी शेंग

(II) गुलमोहराला गूज सांगणारा कोण आहे?

(A) शेतकरी (B) खट्याळ वारा

(C) घरधनी (D) चाफा

(b) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. **3 × 1 = 3**

(I) मळ्याची स्वामीण आल्यावर काय करायला सांगितले आहे?

(II) घरधनीण कोणाची लेक शोभते?

(III) कवितेत कोणकोणत्या फुलांची नावे आली ओहत?

## विभाग – 'ब' – लेखन **15**

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **300** ते **325** शब्दांत निबंध लिहा. **1 × 10 = 10**
(आवश्यकतेनुसार खाली दिलेल्या मुद्द्यांचा आधार घ्यावा.)

I. 'स्त्री जन्मा तुझी कहाणी'

स्त्री चा जन्म – पूर्वीच्या काळी स्त्रीची भूमिका – कौटुंबिक जबाबदाऱ्या – चूल आणि मूल – शिक्षणाचा प्रसार – मुलींच्या शिक्षणाला महत्त्व – आजची स्त्री – स्वातंत्र्य – घर, नोकरी सांभाळणे – महत्त्वाची पदे भूषाविणे – एकूणच समाजातील स्थान.

~

II. वृक्ष आणि मानव

वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व – निसर्गाच्या संतुलनातील वृक्षांचा वाटा – तापमान व हवामानावर नियंत्रण – जमिनीची धूप थांबते – औषधी वनस्पतींचा उपयोग – फळे, लाकूड, इतर उत्पादने – वाढते प्रदूषण, जलस्रोतांचा नाश – वृक्षसंवर्धनाचा उपाय – वृक्षतोडीवर कठोर कायदे – वृक्ष वाचवा, जीवन वाचवा.

III. पेट्रोल संपले तर ....

मानवी जीवनातील इंधनांचे महत्त्व – अपारंपरिक स्रोत – गतीने घटणारा साठा – पेट्रोल संपल्यास वाहतुक ठप्प – उद्योग धंद्यांवर विपरित परिणाम – आर्थिक संकट – प्रदूषण कमी – तापमान वाढ नियंत्रण – जैवविविधतेचे संवर्धन पर्यायी उर्जा स्रोतांचा वापर – जीवनशैली बदलेल.

IV. शेतकऱ्याचे आत्मवृत्त

ग्रामीण जीवन – शेतकऱ्याचे आपल्या शेतीवरील व जनावरांवरील प्रेम – कष्टदायी जीवन – निसर्गावर अवलंबून शेती – दुष्काळ, महापूर, रोगराई इत्यादी संकटे – सरकारकडून अपेक्षा – कमी उत्पन्न, मोठ्या जबाबदाऱ्या – आधुनिक तंत्रज्ञान आणि आव्हाने – पिकांचा अभिमान – शेतकरी सुखी तर समाज सुखी.

4. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर अंदाजे **60** ते **70** शब्दांत उत्तर लिहा. **1 × 5 = 5**

तुमच्या शाळेत झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचा अहवाल लिहा ?

**किंवा/OR**

'महाराष्ट्रामध्ये पुरामुळे जनजीवन विस्कळीत' या बातमीवर आधारीत वृत्तलेख लिहा ?

## विभाग – 'क' – व्याकरण

25

5. सूचनेनुसार उत्तरे लिहा.

(a) पुढील शब्दांपैकी योग्य समानार्थी शब्द ओळखा. **3 × 1 = 3**

I. फुलपाखरू

(A) खग (B) विहंग

(C) पिसोळी (D) पक्षी

II. आदिम

(A) शेवटचा (B) मूळचा

(C) नवीन (D) आधुनिक

III. ईर्षा

(A) द्वेष (B) निष्पाप

(C) काळजी (D) मत्सर

(b) पुढील सामासिक शब्दाचा योग्य समास ओळखा. (कोणतेही **दोन**) **2 × 2 = 4**

I. महायुद्ध

(A) द्वंद्व समास (B) द्विगू समास

(C) कर्मधारय समास (D) तत्पुरुष समास

II. विटीदांडू

(A) द्विगू समास (B) अव्ययीभाव समास

(C) तत्पुरुष समास (D) द्वंद्व समास

III. गावोगाव

(A) अव्ययीभाव समास (B) कर्मधारय समास

(C) द्विगू समास (D) तत्पुरुष समास

IV. राजवाडा

(A) तत्पुरुष समास (B) द्विगू समास

(C) द्वंद्व समास (D) अव्ययीभाव समास

~

(c) पुढील वाक्यांचा सूचनेनुसार प्रयोग ओळखा किंवा बदला. (कोणतेही **तीन**) $3 \times 2 = 6$

I. आईवडिलांनी मुलांना मायेने वाढविले.

या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(A) कर्तरी प्रयोग (B) भावे प्रयोग

(C) कर्मणी प्रयोग (D) कर्म–कर्तरी प्रयोग

II. कर्मणी प्रयोगाचे वाक्य कोणते ते लिहा.

(A) आईने मुलीस समजावले. (B) तो घरी जातो.

(C) रामाकडून रावण मारला गेला. (D) मांजर उंदिर पकडते.

III. मी चहा घेतला. (कर्मणी प्रयोग करा)

IV. तिच्याकडून अभ्यास केला जातो. (कर्तरी प्रयोग करा)

(d) वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्य प्रकार बदला. (कोणतेही **तीन**) $3 \times 2 = 6$

I. आजचा पेपर अजिबात अवघड नाही.

याचे होकारार्थी वाक्य असेल –

(A) आजचा पेपर काय कमी अवघड आहे.

(B) आजचा पेपर खूप सोपा आहे.

(C) आजचा पेपर अवघड आहे.

(D) आजचा पेपर अजिबात सोपा नाही.

II. हापूस आंबा सर्वानाच आवडतो.

याचे प्रश्नार्थक वाक्य असेल –

(A) हापूस आंबा कोणाला आवडतो ?

(B) हापूस आंबाच सर्वांना का आवडतो ?

(C) हापूस आंबा कोणाला आवडत नाही ?

(D) हापूस आंबा सर्वांनाच आवडत नाही कां ?

III. ईश्वरा, सर्वांना चांगली बुद्धी दे. (वाक्याचा प्रकार ओळखा)

IV. हा डोंगर खूप मोठा आहे. (वाक्याचा प्रकार ओळखा)

~

(e) पुढे काही वाक्ये दिली आहेत. कंसात दिलेल्या वाक्प्रचारांपैकी योग्य त्या वाक्प्रचारांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 2 = 6**

(दात ओठ खाणे, आभाळाकडे डोळे लावणे, अंगावर काटा येणे, दातखीळ बसणे, आग ओकणे)

I. जंगलातून जाताना अचानक समोर वाघ पाहून प्रवाशांच्या अंगावर शहोर आले.

II. लोकांसमोर झालेला अपमान पाहून रवी बैठकीतून खूप रागावून निघून गेला.

III. जून महिना सुरू होताच शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पाहतो.

IV. भारतीय जवानांनी शत्रूंवर तोफांतून तीव्र मारा केला.

**विभाग – 'ड' – गद्य-पद्य पाठ आणि उपयोजित लेखन** **25**

6. गद्य पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(a) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणेतेही **दोन**) **2 × 1 = 2**

I. खरा आनंद, टिकाऊ आनंद हा ……. येतो.

(A) पैशांतून (B) अंतरंगातून

(C) निसर्गातून (D) वैभवातून

II. सारं जग ……… असतं.

(A) निवांत (B) शांत

(C) स्वप्नात (D) साखर झोपेत

III. बापू गुरुजींच्या गावाजवळून कोणती नदी वाहते ………

(A) गंगा नदी (B) सिंधू नदी

(C) कृष्णा नदी (D) वाननदी

(b) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे **30** ते **40** शब्दांत लिहा. **2 × 2 = 4**

I. ब्रिगेडियर ठाकूर यांनी लेखिकेला कुशाग्र बुद्धीच्या मुलांना काय सांगायला सांगितले आहे?

II. लेखकाला उत्तररात्रीची वेळ आवडण्याची कारणे लिहा?

III. बापू गुरुजींनी सत्कारात मिळालेल्या पैशांचे काय केले?

IV. दातांशी निगडित असलेल्या कोणत्याही चार म्हणी किंवा वाक्प्रचार लिहा?

(c) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे सुमारे **70** ते **75** शब्दांत लिहा. **2 × 3 = 6**

I. दात दुखतो तेव्हा लेखकाला कोणकोणते साक्षात्कार होतात?

II. एकटे असण्यातही आनंद असतो, हे लेखकाने कसे पटवून दिले आहे?

III. रेशीमबंध पाठात आलेल्या देशी, विदेशी फुलांची नावे लिहा?

7. (a) पद्य पाठांच्या आधारे योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **2 × 1 = 2**

I. शेतकरी स्त्री घरादाराला काय बांधते ..........

(A) लसूण (B) कांदे

(C) ऊस (D) तोरण

II. मी असा की लागती ह्या .......... झळ.

(A) ऊन्हाच्या (B) दुःखाच्या

(C) सूर्याच्या (D) सावल्यांच्याही

III. 'विंचू चावला' भारुडात मोठ्या विंचवासाठी कोणता शब्द आला ..........

(A) वृश्चिक (B) कामक्रोध

(C) इंगळी (D) सत्त्व

(b) कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे सुमारे **35** ते **40** शब्दांत लिहा. **2 × 2 = 4**

I. कवी आषाढघनाला घडिभर आसर करायला का सांगत आहे?

II. शेतकरी स्त्री 'हिरवी होऊन मागं उरते' या ओळीतील विचार स्पष्ट करा?

III. कामक्रोधरूपी विंचू उतरवण्याचे उपाय लिहा?

~

(c) पुढीलपैकी **एका** काव्यपंक्तीचा भावार्थ सुमारे **60** ते **70** शब्दांत लिहा. **1 × 4 = 4**

पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला
सर्वांगाचा दाह झाला ।। 9 ।।

**किंवा/OR**

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

8. पुढील प्रश्नाचे **50** ते **60** शब्दांत उत्तर लिहा. **1 × 3 = 3**

मुलाखतीचे स्वरूप सांगून मुलाखतीची सुरुवात कशी असावी, ते लिहा?

**किंवा**

माहितीपत्रक म्हणजे काय? ते सांगून कोणकोणत्या क्षेत्रांत त्याची गरज असते ते लिहा.

~